# प्रेसनोट

दि. १५/०६/२०२२

## भूमी अभिलेख कार्यालय, इंदापूर, जि.पुणे येथील लिपिकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | इंदापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. गु.र.नं. ४५०/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४१ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - राजाराम दत्तात्रय शिंदे, वय - ५४ वर्षे<br>पद - आवक जावक लिपिक, उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, इंदापूर, जि. पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- ( पंचवीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- ( वीस हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- १०/०६/२०२२

सापळा दिनांक :- १४/०६/२०२२

ठिकाण :- उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, इंदापूर.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे चुलत्यांचे नावे असलेल्या निंबोडी, ता. इंदापूर येथील क्षेत्राची मोजणी दोन महिन्यापुर्वी केलेली असून त्या क्षेत्राची हद्द कायम करण्यासाठी २५ हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे चुलत्यांचे नावे असलेल्या निंबोडी, ता. इंदापूर येथील क्षेत्राची मोजणी दोन महिन्यापुर्वी केलेली असून त्या क्षेत्राची हद्द कायम करण्यासाठी प्रथम २५ हजार रूपयाची लाच मागणी करून तडजोडीअंती २० हजार रूपयांची लाच स्वीकारल्यावर वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००.
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.